RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ११(४)] शनिवार, मार्च ३०, २०१३/चैत्र ९, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**वित्त विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मार्च २०१३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२.**

क्र. ऊखक. १०१३/प्र. क्र. २६(१)/ कराधान-३.—महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा. ९) च्या कलम ३ च्या उप-कलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून आणि शासन अधिसूचना वित्त विभाग क्र. एसजीसी. १०९५/प्र. क्र. ८३(अ)/ कराधान-३, दिनांक ५ डिसेंबर १९९५ निष्प्रभावित करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या उप-कलम (१) खालील कराचा दर विनिर्दिष्ट करीत आहे,—

(क) दिनांक १ एप्रिल २०१३ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणा-या आणि दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी संपणा-या कालावधीसाठी ५ टक्के ;

(ख) दिनांक १ एप्रिल २०१४ पासून पुढील कालावधीसाठी ३ टक्के ;

जो ऊस खरेदी च्या उलाढालीवर आकारला जाईल, जी खरेदी कारखान्यांत किंवा घटकांमध्ये साखर उत्पादित किंवा उत्पादन करण्यासाठी वापरली जात असेल आणि अशी खरेदी कारखान्यात किंवा घटकामध्ये खांडसरी उत्पादित किंवा उत्पादन करण्यासाठी वापरली जात असेल तर त्यावर कर नसेल असे घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. चै. भांगडीया,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 30th March 2013.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PURCHASE TAX ON SUGARCANE ACT, 1962.

No.SCPT-1013/CR-26(1)/Taxation-3.- In exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 3 of the Maharashtra Purchase Tax on Sugarcane Act, 1962 (Mah. IX of 1962) and in supersession of the Government Notification, Finance Department, No. SGC. 1095/CR-83(A)/ Taxation-3, dated the 5th December 1995, the Government of Maharashtra hereby specifies the rate of tax under sub-section *(1)* of section 3 of the said Act to be,-

*(a)* 5 per cent. for the period commencing on or after the 1st April 2013 and ending on 31st March 2014;

*(b)* 3 per cent. for the period commencing with effect from the 1st April 2014 onwards;

which shall be levied on the turnover of purchase of sugarcane, being purchases for the purpose of the use thereof in the manufacture or production of sugar in a factory or unit and declares that no tax shall be levied on the turnover of purchases of sugarcane being purchased for the purpose of the use thereof in the manufacture or production of *Khandsari* in a factory or unit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

O. C. BHANGADIA,
Deputy Secretary to Government.

## वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मार्च २०१३.

## अधिसूचना

**महाराष्ट्र ऊस खरेदीकर अधिनियम, १९६२.**

क्रमांक ऊखक १०१३/प्र. क्र.२६(२)/कराधान-३.- महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम, १९६२ च्या नियम १० च्या उप-नियम (१) च्या खंड (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना क्रमांक ऊखक-१०११/प्र. क्र. १००/ कराधान-३, दिनांक ३० एप्रिल २०११ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

सदर अधिसूचनेतील,—

(अ) " ५० रुपये " या शब्द व अंकाऐवजी " १०० रुपये " हे शब्द व अंक दाखल करण्यात येत आहे.

(ब) " १ मे २०११ " या शब्द व अंकाऐवजी " १ एप्रिल २०१३ " हे शब्द व अंक दाखल करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. चै. भांगडीया,**

शासनाचे उप सचिव.